# _कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिका_

*मुंबई सेंट्रल ते कफ परेड स्थानकांसाठी 'व्होल्टाज लिमिटेड' करणार वायू विजन व पर्यावरण नियंत्रण*

मुंबई, दि. २७ ऑगस्ट २०१९ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन द्वारे (मुं.मे.रे.कॉ) कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेअंतर्गत मुंबई सेंट्रल ते कफ परेड मेट्रो स्थानकांच्या वायू विजन (टनेल व्हेंटिलेशन) आणि पर्यावरण नियंत्रण यंत्रणेच्या उभारणीसाठी 'व्होल्टाज लिमिटेड' ची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायका (जपान इंटरनॅशनल को - ऑपरेशन एजन्सी) च्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली आहे.

'व्होल्टाज लिमिटेड' मेट्रो ३ च्या मुंबई सेंट्रल ते कफ परेड मेट्रो स्थानकांदरम्यानच्या वायू विजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेचे काम करणार आहे. ज्यामध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग आदी कामांचा समावेश राहिल.

वायू विजन यंत्रणा (टीव्हीएस) ही महत्त्वपूर्ण जीवन सुरक्षा प्रणाली आहे जी आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांचे आग आणि धूर यासारख्या समस्येपासून जास्तीत जास्त संरक्षण करेल. भविष्यात मेट्रो स्थानकामध्ये रहदारी वाढली तरीही स्थानकामध्ये योग्य ते तापमान आणि हवा राखून ठेवण्याचे सामर्थ्य या यंत्रणेमध्ये असणार आहे.

पर्यावरण नियंत्रण प्रणाली ही मुंबई मेट्रो ३ च्या स्थानकामध्ये प्रवाशांना ताजी हवा मिळावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत धूर गमनासाठी व तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

याप्रसंगी मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, "वायू विजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली मेट्रो-३ मार्गिकेतील महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो-३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत वायू व्हिजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीची उभारणी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

---

**Rajesh Konduparti**
**+91 8469834515**
[Rajesh.konduparti@perceptindia.in](mailto:Rajesh.konduparti@perceptindia.in)